# प्रकरण - ४ थे

## बार्शी बाजार समिती आणि ज्वारीचे विपणन

### ४·१ बार्शी बाजार समितीची स्थापना :


विनियमित कृषी विपणनामध्ये विशेष महत्व असते ते कृषी उत्पन्न बाजार समितीला· विनियमित बाजारपेठेचे फायदे या बाजारपेठेशी संबंधित असणा-या घटकाना मिळवून देण्याची जबाबदारी या समितीची असते· यामुळे या प्रकरणामध्ये कृषी उत्पादन बाजार समिती, बार्शीची स्थापना आणि ज्वारीच्या विपणात तिचे योगदान यांचा विचार केला आहे· १९३९ च्या मुंबई बाजार कायद्यानुसार कृषी उत्पादन बाजार समिती,बार्शी ची स्थापना सरकारी जाहीरनामा क्र·९४२२-३९, ९ जुलै, १९४७ नुसार १ जानेवारी,१९४८ रोजी झाली· प्रत्यक्ष कार्याला सुरुवात ७ नोव्हेंबर,१९४९ रोजी झाली· बार्शी तालुका बाजार क्षेत्राकरिता दिनांक १७ एप्रिल,१९४८ रोजी पहिली बाजार समिती सरकारने नियुक्त केली· या सभासदांची पहिली सभा ३ मार्च, १९४८ रोजी भरुन प्रत्यक्ष कामकाज दिनांक ७ नोव्हेंबर,१९४९ पासून सुरु झाले· नंतर दिनांक २६ जून,१९५० रोजी निवडणूक होउन पहिले लोकनियुक्त प्रतिनिधी मंडळ दिनांक १५ मे, १९५१ पासून अस्तित्वात आले· १९८६-८७ पर्यंत लोक नियुक्त प्रतिनिधी मंडळाच्या नउ निवडणुका झालेल्या आहेत·

### ४·२ मुख्य आणि उपबाजार आवार :

कृषी उत्पादन बाजार समिती,बार्शी क्षेत्रात दोन बाजार आवारे आहेत· त्यापैकी बार्शी येथील मुख्य बाजार आवार "पंडित जवाहरलाल नेहरु

# कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शीचा मुख्य बाजार स्थानाचा नकाशा.

- सिटी सर्व्हे नंबर ४०६७/२.




— स्केल —

१ इंचास ३३० फूट.

नकाशा तयार करणार

— बी. जी. काळे. —

लायसेन्स सर्व्हेअर, बार्शी

४-१-६८.

— सचिव —

कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शी.

प्रमुख बाजार आवार" असे संबोधले जाते· हे आवार ४२ एकर १८ गुंठे क्षेत्रफळाचे आहे· या आवारात शेतकरी, अडतव्यापारी व इतर व्यावसायिक याना निरनिराळया उपयुक्त सोयी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत· इथे अडतबाजार, कडबाबाजार, कांदामिरचीबाजार व जनावर बाजार भरतो· अडत बाजारासाठी १४२ गाळे व्यापा-याना उपलब्ध करुन दिलेले आहेत· विहिरीवर वीज पंप बसवून सर्वत्र नळाने पाणीपुरवठा केलेला आहे· जनावरांच्य बाजारातही वीज व पाणी पुरवठा, दिवाबत्ती, रस्ते, पिण्याच्या पाण्याचे व सांडपाण्याचे हौद इत्यादी सोयी केलेल्या आहेत· या आवारात बाजार स्थलांतरित होउन १८ वर्षे झालेली आहेत· वैराग दुय्यम बाजाराची स्थापना दिनांक २१ डिसेंबर,१९५५ रोजी झाली· या बाजार आवारासाठी बाजार समितीने २५ एकर जागा विकत घेतली असून तारेचे कुंपण घालण्यात आले आहे· या बाजार अडत व्यापा-यासाठी २३ गाळे बांधले असून ते गाळे व्यापा-यांना दिलेले आहेत· सध्या तेथेच अडत बाजार चालू आहे· सध्या या आवारामध्ये जनावरांचा व कडबा बाजारही भरतो· तेथेही वीज, पाणीपुरवठा इत्यादी सोयी केलेल्या आहेत· मुख्य बाजार आवार तालुक्यातील कांही गावाना लांब पडत असल्याने शेतक-यांना शेतीमालाच्या विक्रीची नजिक व्यवस्था करुन देण्याच्या शासनाच्या धोरणानुसार बार्शी बाजार समितीने वैराग या उप-बाजारा व्यतिरिक्त येडशी-तडवळे येथेही उप-बाजाराची व्यवस्था केलेली होती पण सध्या ती गांवे (येडशी-तडवळे) उस्मानाबाद जिल्हयात गेल्यामुळे बार्शीतील मुख्य बाजार आवार आणि वैराग येथील दुय्यम बाजार आवार या दोनच ठिकाणी कृषी उत्पादन बाजार समिती आपले कार्य करत आहे·

### ४·३ बाजार समिती :

१९६३ च्या बाजार कायद्यानुसार प्रत्येक विनियमित बाजारपेठेत एक बाजार समिती नेमावी लागते· ही निवड मतदानाच्या माध्यमातून केली जाते·

बार्शी कृषी उत्पादन बाजार समिती या नियमाला अपवाद नाही. या विनियमित बाजारपेठेत निवडल्या जाणा-या बाजार समितीची रचना तक्ता क्र.४.१ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता क्र. ४.१

बार्शी कृषी उत्पादन बाजार समितीच्या सभासदांची वर्गवारी

| अनुक्रमांक | सभासदांची वर्गवारी | सभासद संख्या |
|---|---|---|
| १. | शेतीमाल उत्पादक मतदार संघ | ७ |
| २. | ग्रामपंचायत मतदार संघ | ३ |
| ३. | व्यापारी मतदार संघ | ३ |
| ४. | सहकारी संस्था मतदार संघ | १ |
| ५. | तालुका पंचायत समिती, बार्शी | १ |
| ६. | स्थानिक स्वराज्य संस्था | १ |
| ७. | सरकार नियुक्त | २ |
| | एकूण .. | १८ |

आधार : कृषी उत्पादन बाजार समिती, बार्शी वार्षिक अहवाल, १९८६-८७.

वरील तक्त्यावरुन शेतीमाल उत्पादक मतदार संघ व ग्रामपंचायत मतदार संघातून निवडण्यात येणारे अनुक्रमे ७ आणि ३ असे एकूण १० सभासद शेतकरी असले पाहिजेत अशी कायद्यात तरतूद आहे. तसेच सरकारनियुक्त सभासदामध्ये एक सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी तर दुसरा सभासद

जिल्हा शेतकी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर आहे.

## ४.४ विनियमित केलेल्या वस्तू :

विनियमित बाजार पेठेचे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे या बाजारात शासनाने परवानगी दिलेल्या (विनियमित केलेल्या) वस्तूंच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार चालतात. बार्शी बाजार आवारामध्ये शासनाने स्थापनेच्या वेळेला (१९४७) शेंगा, शेंगदाणे, कापूस व रुई या वस्तूंना विनियमित वस्तू म्हणून मान्यता दिली होती. वस्तूंचे विनियमन करण्यासाठी बाजार समिती शेतक-यांच्या मागणीनुसार वस्तूंची यादी विनियमित वस्तू म्हणून मान्यता घेण्यासाठी शासनाकडे पाठवते. शासनाने मान्यता दिल्यानंतर त्या वस्तू विपणनाच्या व्यवहारासाठी विनियमित वस्तू म्हणून जाहीर केल्या जातात. बार्शी बाजार समितीने आपले कामकाज सुरु झाल्या पासून १९८६-८७ पर्यंत एकंदर १९ शेतीमालाचे व जनावरांचे विनियमन केले आहे. बार्शी बाजार आवारात विनियमित केलेल्या शेतीमालाच्या विनियमनाच्या जाहीरनाम्याचा क्रमांक व तारीख दर्शविणारा तपशील तक्ता ४.२ मध्ये दिला आहे. त्यावरुन बाजार समितीने शेतीमाल विनियमनाच्या कार्यात प्रगतीकडे वाटचाल केल्याचे दिसून येते.

## ४.५ प्रतवारी करण्यात येणारा शेतीमाल :

शेतीमालास त्याच्या दर्जानुसार किंमत प्राप्त होण्यासाठी आणि ग्राहकाना निर्भेळ शेतीमाल मिळण्यासाठी बाजार आवारात शेतीमालाच्या प्रतवारीची सुविधा असणे आवश्यक आहे. बाजार समितीच्या कामकाजातील जी कांही प्रमुख कर्तव्ये कायद्याने ठरवून दिलेली आहेत त्यापैकी प्रतवारीचे

कामाची प्रगती बार्शी बाजार आवारात काही प्रमाणात झालेली आहे· मालधन्यानी या योजनेचा स्वीकार केला आहे व ती राबवण्यात त्यांचा मोठा वाटा आहे· त्यांच्या दृष्टीने शेतीमाल विकणे म्हणजे प्रतवारी होऊन योग्य दरात व फायदेशीररीत्या विकणे हे समीकरण झाले आहे· शेतक-याना आपला माल योग्य प्रत ठरवून विकल्याचे व ग्राहकानाही जी किंमत दिली आहे त्याच प्रतीचा माल मिळत असल्याचे समाधान लाभत आहे· परपेठांच्या खरेदीदाराना फोन किंवा टपालाद्वारे वस्तूंच्या प्रतीनुसार मालाची खरेदी करणे सुकर झाले आहे· त्यामुळे भेसळ करण्याच्या प्रवृत्तीस आळा बसला आहे· प्रतवारीकार आपल्या फिरतीच्या कार्यक्रमातून प्रत्येक गावी शेतक-यास प्रतवारी व प्रतीसंबंधी माहिती व मार्गदर्शन देऊन बाजारपेठेतील व्यवहार त्वरित घडवून आणण्यासाठी प्रतवारी महत्वाची असल्याचे पटवून देतात· त्यामुळे प्रतवारी हा विषय सर्वांच्या परिचयाचा झाला आहे· बार्शी कृषी उत्पादन बाजार समितीने १९६२ पासून प्रतवारी योजना अंमलात आणली आहे· सध्या भुईमूग, तूर, मूग, उडीद, ज्वारी आणि हळद या सहा शेतीमालाची लिलाव होण्यापूर्वी व्यापारी प्रतवारी ठरवली जाते· बार्शी येथे दोन प्रतवारीकार कर्मचारी असून वैराग येथे एका कर्मचारी आहे· तसेच बार्शी व वैराग येथे शासनामार्फत प्रत्येकी एक कर्मचारी प्रतवारीचे कार्य करत आहे· बार्शी बाजारपेठेत भुईमुगाच्या प्रतवारीपासून प्रारंभ झाला· तो प्रयोग यशस्वी झाल्यानंतर तूर, मूग, उडीद व ज्वारी यांची प्रतवारी १९६२ पासून तर १९७० पासून हळदीची प्रतवारी सुरु करण्यात आली· तक्ता क्र· ४·१ मध्ये १९६६ पासून शासनाकडून ठरवून दिलेल्या शेतीमालाची बाजार समितीने केलेली प्रतवारी दाखवलेली आहे·

## तक्ता क्र. ४.२

### विनियमित वस्तू - सरकारी जाहीरनामा व अंमलबजावणीची तारीख

| अनुक्रमांक | विनियमित शेतीमाल | सरकारी जाहीरनामा | अंमलबजावणी तारीख |
|---|---|---|---|
| १. | शेंगा, शेंगदाणे, कापूस व रुई | ९४२२-३९ दिनांक ९.७.१९४७ | ७.११.१९४९ |
| २. | तूर, मूग, उडीद, करडई | पीएमए-३९५१ दिनांक १.९.१९५१ | १.११.१९५१ |
| ३. | ज्वारी, बाजरी, गहू, खपली-गहू, हरभरा, तीळ, जवस, हळद धणे, मिरची (सुकी) | पीएमए-३१५४ दिनांक २९.५.१९५४ | २७.५.१९५५ |
| ४. | गूळ व कडबा | पीएमए/३९५६ सी. दिनांक २६.६.१९५६ | २२.४.१९५७ |
| ५. | चिंच, एरंडी, अंबाडी, कारळे, साळी व जनावरे (गाय, बैल, म्हैस, रेडे, शेळया व मेंढया) | पीएमए १४/बार्शी दिनांक १५.७.१९५९ | १.१०.१९६० जनावरे : ४.४.१९६४ |
| ६. | वरई (राळे) मका, सावा हुलगा व कांदा | सीएमआर/आर१२६९ दिनांक १५.५.१९६९ | २०.१०.१९६९ |
| ७. | बटाटा, लसूण, मटकी, मोहरी | सीएमआर-आर-१२/बार्शी -७६ दिनांक ३.५.१९७६ | १.३.१९७७ |
| ८. | निंबोळी, निंबोळी बी, सूर्यफूल, चिंचोके | एपीएम-आर१०बार्शी- दि.५.४.१९८३ आणि ३०.५.१९८३ | ५.११.१९८३ |

आधार : कृषी उत्पादन बाजार समिती, बार्शी-वार्षिक अहवाल, १९७७-७८ आणि १९८६-८७.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## तक्ता क्र. ४.३

### बार्शी बाजार समितीच्या क्षेत्रातील शेतीमालाची व्यापारी प्रतवारी

(क्विंटल मध्ये)

| बाजार वर्ष | भुईमूग | तूर | मूग | उडीद | हळद | ज्वारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १९६२-६३ | ९३,७३३ | ३०,८९४ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | ५४,० |
| १९६५-६६ | ४०,४६० | १६,१४७ | ४२,५८१ | १६,२७० | उ.ना. | १०,३ |
| १९६७-६८ | १,९१,७४६ | ४२,०७३ | ३४,०६६ | १४,०६९ | उ.ना. | एकाधिकार- |
| १९७०-७१ | ९१,२६८ | ४३,०४५ | १६,५९६ | ८,००५ | उ.ना. | -"- |
| १९७४-७५ | १४,७२१ | ४४,८५१ | १०,८०२ | ३,६१८ | ४,८४४ | १,००,१ |
| १९७९-८० | ४४,०१४ | १,१२,८३९ | ६,६४१ | २,१८२ | ४,६७५ | १,९६,७ |
| १९८५-८६ | १४,४०५ | ६५,२९२ | ३,६२० | ४,१०८ | ८,०५० | १,३०,२ |
| १९८६-८७ | १०,०९५ | २३,४६१ | ७,२०० | ४,८६१ | ७,८४१ | ८६,२ |

* उ.ना. : उपलब्ध नाही.

आधार : कृषी उत्पादन बाजार समिती, बार्शी, रौप्यमहोत्सव १९५०-७५, "स्मृतिगंध" आणि संबंधित वर्षाचे अहवाल.

तक्ता क्र.४.३ चे अवलोकन केल्यास, व्यापारी प्रतवारी मध्ये ज्वारीचेच प्रमाण सर्वाधिक आहे असे आढळेल. परंतु त्याचबरोबर लक्षात घेण्यासारखी विशेष गोष्ट म्हणजे, ज्वारी बरोबरच, हळद वगळता इतर सर्व वस्तूंच्या व्यापारी प्रतवारीचे परिमाण कमी होण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती दृष्टोत्पतीस येते. याची विशेष दखल घ्यायला हवी. त्यातल्या त्यात, ज्वारी ही बार्शी बाजार पेठेतील सर्वातमहत्वाची वस्तू असल्यामुळे, या वस्तूंच्या प्रतवारीबाबत अधिक जागरूकता दाखविण्याची गरज आहे.

ज्वारीचे प्रतवारीचे परिमाण कमी होण्याकडे कल असला तरी याच कालखंडात इतर चार वस्तूंच्या परिमाणात फार मोठया प्रमाणात घट झाल्याने प्रतवारी होऊन विक्री झालेल्या शेतीमालाच्या एकूण परिमाणात ज्वारीची टक्केवारी वाढण्याची प्रवृत्ती राहिली आहे हे तक्ता क्र•४•४ वरुन ध्यानात येईल•

तक्ता क्र• ४•४

प्रतवारी करुन विकलेल्या शेतीमालात ज्वारीची टक्केवारी

| बाजार वर्ष | प्रतवारी केलेल्या सर्व वस्तूंची विक्री | | प्रतवारीनंतर ज्वारीची विक्री | | ज्वारीची एकू प्रतवारीतील | |
|---|---|---|---|---|---|---|
| | क्विंटल | किंमत रुपये | क्विंटल | किंमत रुपये | क्विंटल | किंमत |
| १९७३-७४ | १,१०,९५७ | १,९२,६९,६५९ | ३७,७०६ | ५६,९७,३८५ | ३४•०० | २९•५६ |
| १९७४-७५ | २,०९,१८६ | ३,५२,२४,४८६ | १,००,१५० | १,९०,७८,४२४ | ४७•८८ | ५४•१६ |
| १९७७-७८ | २,६७,३३९ | ६,३९,९५,८९३ | १,५९,१७० | ३,२८,६७,४२१ | ५९•५४ | ५१•३५ |
| १९७८-७९ | ३,०३,९५६ | ५,४१,३१,५६८ | १,३३,६०५ | १,४५,६३,०४९ | ४३•९५ | २६•९० |
| १९७९-८० | ३,४२,७०२ | ६,३६,७१,९६७ | १,९६,७८८ | २,५४,६०,९२८ | ५७•४२ | ४०•१७ |
| १९८५-८६ | २,२५,७७१ | ७,३०,६६,५५८ | १,३०,२७६ | २,७६,२३,०२७ | ५७•७० | ३७•४० |
| १९८६-८७ | १,३९,६८६ | ५,०४,३०,२८१ | ८६,२२८ | १,८५,०८,३२४ | ६१•७२ | ३६•६७ |

आधार : कृषी उत्पादन बाजार समिती,बार्शी - संबंधित वर्षाचे वार्षिक अहवा

१९७३-७४ ते १९८६-८७ याकाळात एकूण प्रतवारी केलेल्या वस्तूंच्या परिणामामध्ये ज्वारीच्या प्रतवारीची टक्केवारी ३४ वरुन ६१•७२ पर्यंत वाढली आहे• मात्र याउलट एकूण किंमतीतील प्रमाण अतिशय दोलायमान राहिले आहे,

ते १९७३-७४ मध्ये २९·५६ होते आणि १९७४-७५ मध्ये एकदम ५४·१६ टक्के झाले· त्यानंतर यामध्ये लक्षणीय चढउतार होत राहिले आणि अखेरीस १९८६-८७ मध्ये ती टक्केवारी ३६·६७ झाली· याचा अर्थ एवढाच की, मध्यंतरीच्या काळात ज्वारीच्या बाजारभावात झालेली वाढ इतर मालांच्या बाजार भावाच्या तुलनेने कमी कमी होत गेली· इतर वस्तू कडधान्ये, भुईमूग आणि हळद या [redacted] असल्याने आणि त्यांच्या राष्ट्रीय उत्पादन वाढीचा वेगही अत्यंत कमी राहिल्याने त्यांच्या किंमती या काळात झपाटयाने वाढल्या आहेत· ज्वारीच्या बाबतीत मात्र तसे घडले नाही· विशेषत: अधिक उत्पन्न देणाऱ्या बियाणांचा वापर झाल्याने ज्वारी उत्पादनाच्या वाढीचा वेग या इतर पिकांच्या उत्पादन वाढीच्या वेगाच्या तुलनेने अधिकच राहिला· परिणामी ज्वारीचा बाजारातील पुरवठा वाढता राहिला· शिवाय, शासनाने ज्वारीची सक्तीची वसुली करण्याचे धोरण अनुसरुन ज्वारीचा पुरवठा सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून चालू ठेवला, परिणामी ज्वारीच्या किंमतवाढीला मर्यादा पडल्या· त्याचेच प्रतिबिंब बार्शीच्या बाजारात उमटले आहे·

## ४·६ <u>बाजार आवारातील सुविधा</u> :

बार्शी बाजार समितीची स्थापना १ जानेवारी, १९४८ मध्ये झाली· तेव्हा पासून १९६९ पर्यंत सर्वच शेतीमालाचा बाजार शहरातील अडत बाजारात भरत होता· १९६९ मध्ये बाजार समितीने बाजार आवारात बाजार भरविण्यास सुरुवात केली· या बाजार आवाराला "पंडित जवाहरलाल नेहरु प्रमुख बाजार आवार" असे नामकरण करण्यात आले· या बाजार आवारासाठी बाजार समितीने ४२ एकर १८ गुंठे जमीन प्राप्त करुन त्यावर शेतीमालधनी, अडते, व्यापारी व इतर व्यवसायिकाना निरनिराळया उपयुक्त सोयी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत· या आवारात अडत बाजार, कडबा बाजार आणि

जनावर बाजार भरतात. अडत बाजारासाठी बाजार समितीने १४२ गाळे व्यापा-याना उपलब्ध करुन दिलेले आहेत. शिवाय, रस्त्यावरील दिवे, पिण्याचे पाणी तसेच जनावर बाजारात जनावरासाठी पाण्याचे हौद तयार केलेले आहेत. याशिवाय बाजार आवारामध्ये उपाहारगृहे, पानपट्टीची दुकाने, निवारे, टपाल कार्यालय, इत्यादी सोयी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. बाजार समितीने आपले स्वतंत्र कार्यालय बांधले आहे. त्यामध्ये शेतीमाल विपणनासंबंधी व सहकारावरील माहिती असणारे एक ग्रंथालयही आहे. बाजार समितीने [illegible], तूर, मुईमूग, उडीद, मूग आणि हळद या शेतीमालाची प्रतवारी करुन विकण्याची पध्दती अंमलात आणलेली आहे. उघड लिलाव पध्दतीचा अवलंब करुन जास्तीत जास्त किंमत देणा-या खरेदीदारासच शेतीमाल विकला जातो. शास्त्रशुध्द प्रतवारी हे या बाजारपेठेचे वैशिष्टय आहे. तसेच परवानाधारक तोलारांचे गट पाडून प्रत्येक गट आळीपाळीने रोज नवीन अडत दुकानी शेतीमालाचे वजन करण्यासाठी पाठविले जातात. यामुळे विशिष्ट तोलार एकाच अडत दुकानी राहून अडत्या व तोलारामध्ये संगनमत हो[illegible] शेतक-यांची फसवणूक केली जाण्याची जी शक्यता होती ती टाळण्यात आलेली आहे. सर्व तोलाराना सारखे काम मिळण्याची ही व्यवस्था झालेली आहे. चढत्या किंमतीचा लाभ उत्पादकाना मिळावा म्हणून राज्य वखार मंडळाने बाजार आवारातच गोदाम व्यवस्था केलेली आहे. परंतु या साठवण सोयीचा फायदा उत्पादकापेक्षा व्यापारी वर्ग अधिक घेत असल्याचे आढळते. याचे प्रमुख कारण म्हणजे उत्पादकाला योग्य किंमत येईपर्यंत थांबण्याची ताकत कमी आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने वाहतूक व्यवस्थेमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. त्यामुळे नवीन रस्त्यांची बांधणी होत आहे. याचा शेतक-याना फायदा होत आहे. हे बार्शी पेठेतील शेती-मालाच्या वाढत्या आवकेवरुन स्पष्ट होते. बार्शी बाजारपेठेत आणखी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे शेतीमालाची विक्री झाल्याबरोबर उत्पादकास त्याच्या मालाची किंमत विनाविलंब दिली जाते. याबाबतीत उत्पादकाकडून

येणा-या तक्रारीचे तत्परतेने निराकरण करण्यात येते. उत्पादकाना बाजारा-विषयी माहिती देण्याचा प्रयत्न बाजार समितीकडून कसोशीने केला जातो. त्यासाठी तालुक्यातील प्रमुख ग्रामपंचायती व सहकारी संस्थाना दररोज पेठेत होणा-या उलाढालीची व शेतीमालाच्या किंमतीची माहिती टपालाद्वारे कळविली जाते. ही माहिती प्रसिध्द करण्यासाठी ग्रामपंचायतीना फलकही देण्यात आलेले आहेत. बाजार समिती " बाजाराची वाटचाल " या नावाने प्रथमतः पाक्षिक आणि अलिकडेच मासिक यारुपात नियमितपणे प्रसिध्द करते. तसेच आकाशवाणीवर दररोज बाजारभाव सांगीतले जातात. त्यामध्ये बार्शी बाजार पेठेतील शेतीमालाच्या किंमतींचाही समावेश असतो. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी अमलात आणलेल्या एकाधिकार व लेव्ही खरेदी योजनेस बाजार समितीने नेहमीच सहकार्य केलेले आहे. तसेच शेतीमाल विक्रीमधून सहकारी संस्थांची कर्ज वसुलीही करुन दिलेली आहे.

## ४.७ बाजार समितीचे आकार :

कोणत्याही बाजार व्यवस्थेला जरुरीनुसार उत्पन्न मिळवून कार्यदक्ष विपणन व्यवस्था निर्माण करण्यासाठी खर्चही करावा लागतो. बाजार समितीने कोणकोणत्या मार्गांनी उत्पन्न मिळवावे हे विपणन कायद्यानुसार निश्चित केलेले असते. त्या चौकटीत राहून बार्शी बाजार समिती बाजार शुल्क, प्रतवारी शुल्क आणि अनुज्ञाप्ती शुल्क या माध्यमातून आपले उत्पन्न मिळवते. याचा थोडक्यात आढावा पुढे दिला आहे.

### ४.७.१ अनुज्ञाप्ती शुल्क :

कृषी उत्पादन बाजार समितीच्या उपविधीनुसार बाजार आवारात शेती उत्पादनाची खरेदी-विक्री व अन्य संबंधित व्यवहार करु इच्छिणा-या

व्यक्तींना महाराष्ट्र शेती उत्पादन विपणन कायदा, १९६७ मधील नियम क्रमांक ६ व ७ च्या अनुषंगाने तक्ता क्र•४•५ मध्ये नमूद केल्या प्रमाणे बाजाराच्या प्रत्येक वर्षाकरिता अनुज्ञाप्ती शुल्काची संपूर्ण रक्कम अर्जासोबत बाजार समितीकडे भरुन परवाना द्यावा लागतो•

तक्ता क्र•४•५

अनुज्ञाप्ती शुल्काचे वार्षिक दर

| अनुक्रमांक | अनुज्ञाप्तीधारकाचा प्रकार | | वार्षिक दर (रुपये) |
|---|---|---|---|
| १• | अडते : | "अ" वर्ग अडते | १०० |
| | | "ब" वर्ग अडते | १०० |
| २• | व्यापारी : | "अ" वर्ग व्यापारी | १०० |
| | | "ब" वर्ग व्यापारी | ५० |
| | | "क" वर्ग व्यापारी | ५० |
| | | "ड" वर्ग व्यापारी | ५० |
| | | "इ" वर्ग व्यापारी | ३० |
| | | "फ" वर्ग व्यापारी | १० |
| | | "ग" वर्ग व्यापारी | १० |
| ३• | प्रक्रिया करणारे | | ३० |
| ४• | तोलाईदार | | १० |
| ५• | गाडीभाडे गट अभि• | | १० |
| ६• | वखारवाले | | १५ |
| ७• | मदतनीस | | २ |
| ८• | हमाल | | २ |
| ९• | बैल गाडीवान | | २ |
| १०• | गोदाम नोंदणी शुल्क | | १ |

टीप : "अ" वर्ग अडते - मोठे अडते. "ब" वर्ग अडते - कडबा दलाल.
व्यापारी "अ" वर्ग - मोठे व्यापारी. "ब" वर्ग - तेली व्यापारी.
"क" वर्ग - फडकरी व्यापारी. "ड" वर्ग - कांदा मिरची व्यापारी. "इ" वर्ग - कडबा व्यापारी. "फ" वर्ग- स्वस्त धान्य दुकान आणि "ग" वर्ग- जनावर व्यापारी.

आधार : कृषी उत्पादन बाजार समिती, बार्शी कडील कार्यालयीन माहितीवरुन.

---

या अनुज्ञाप्ती शुल्काच्या स्वरुपात बाजार समितीला लक्षणीय अशी प्राप्ती होत राहिली आहे. समितीला यामार्गाने १९४९-५० मध्ये २८,८१३ रुपये मिळाले तर १९८६-८७ मध्ये ही रक्कम ४९,४६१ रुपयापर्यंत वाढल्याचे तक्ता क्र. ४.६ वरुन ध्यानात येईल. वाढत्या व्यापाराबरोबर व्यापाऱ्यांची तसेच बाजारातील इतर प्रकारच्या अनुज्ञाप्ती धारकांची संख्या वाढणे अनिवार्य असते. तथापि, अनुज्ञाप्ती धारकांच्या संख्येत व त्यामुळे अनुज्ञाप्ती शुल्कात मोठाले चढउतार झालेले आहेत याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही.

तक्ता क्र. ४.६

बार्शी बाजार समितीला मिळालेले अनुज्ञाप्ती शुल्क(रुपये)

| वर्ष | अनुज्ञाप्ती शुल्क | निर्देशांक |
|---|---|---|
| १९४९-५० | २८,८१३ | १०० |
| १९५०-५१ | १७,३९६ | ६० |
| १९५१-५२ | २१,०८६ | ७३ |
| १९५२-५३ | १८,२२८ | ६३ |
| १९५३-५४ | २०,६०१ | ७१ |

तक्ता क्र.४.६ पुढे चालू

| वर्ष | अनुज्ञाप्ती शुल्क | निर्देशांक |
|---|---|---|
| १९५४-५५ | २०,४५५ | ७१ |
| १९५५-५६ | ३२,७६३ | ११४ |
| १९५६-५७ | ३६,३४८ | १२६ |
| १९५७-५८ | ३४,६६५ | १२० |
| १९५८-५९ | ३४,२५७ | ११९ |
| १९५९-६० | ३८,६६१ | १३४ |
| १९६०-६१ | ३९,६६८ | १३८ |
| १९६१-६२ | ३०,२२३ | १०५ |
| १९६२-६३ | २२,०२६ | ७६ |
| १९६३-६४ | २३,२५५ | ८१ |
| १९६४-६५ | १९,०२५ | ६६ |
| १९६५-६६ | २१,९५५ | ७६ |
| १९६६-६७ | २२,६६५ | ७९ |
| १९६७-६८ | २९,३६४ | १०४ |
| १९६८-६९ | २६,७९६ | ९३ |
| १९६९-७० | २५,८२७ | ९० |
| १९७०-७१ | २६,२२९ | ९१ |
| १९७१-७२ | २७,७६३ | ९६ |
| १९७३-७४ | २९,२३४ | १०१ |
| १९७४-७५ | ३१,७९९ | ११० |
| १९७५-७६ | ३४,५५३ | १२० |
| १९७६-७७ | ३३,५६५ | ११६ |

तक्ता क्र·४·६ पुढे चालू

| वर्ष | अनुज्ञाप्ती शुल्क | निर्देशांक |
|---|---|---|
| १९७७-७८ | ३४,५६७ | १२० |
| १९७८-७९ | ३६,०१८ | १२५ |
| १९७९-८० | ३९,४३६ | १३७ |
| १९८५-८६ | ४७,२६० | १६४ |
| १९८६-८७ | ४९,४६१ | १७२ |

आधार : कृषी उत्पादन बाजार समिती, बार्शी, संबंधित वर्षाचे अहवाल·

तक्ता क्र·४·६ चे अवलोकन केल्यास, बाजार समितीने विनियमन सुरु केल्या नंतर विशेषत: १९५१-६१ या दशकभरात अनुज्ञाप्ती शुल्कापासूनच्या उत्पन्नात दुपटीहूनही थोडी अधिक वाढ झाली· परंतु त्यापाठोपाठ १९६१-६२ ते १९६४-६५ या चारच वर्षात या उत्पन्नाला इतकी झपाटयाने गळती लागली की, १९६४-६५ चे उत्पन्न (१९,०२५ रुपये) हे १९६०-६१ च्या उत्पन्नाच्या (३९,६६८रुपये) निम्म्याहूनही थोडेसे कमीच होते असे का घडावे ? हा कालखंड महाराष्ट्राच्या दृष्टीने प्रचंड धान्य टंचाईचा गेला त्यातच ज्वारी या राज्यातील प्रमुख धान्य पिकाची टंचाई प्रकर्षाने जाणवत होती· यामुळे ज्वारीच्या व्यापाराला मोठी खीळ बसून कांही व्यापाऱ्यांनी त्यातून अंग काढून घेतले असे जाणवते· त्यातच राज्यात १९६३ पासून ज्वारी एकाधिकाराची योजना कार्यान्वित झाली· त्यामुळे ज्वारीचा खाजगी व्यापार संपलाच· ज्वारी एकाधिकाराची योजना १९७१-७२ पर्यंत अस्तित्वात होती· त्याकाळात १९६५-६६ पासून अनुज्ञाप्ती शुल्काच्या उत्पन्नात कांहीशी वाढ झाली खरी· अर्थात ती वाढ इतर शेतीमालाच्या व्यापारातील वाढीच्या कारणानेच झाली असेच म्हणावे लागेल· १९७३ पासून ज्वारी व्यापार खुला झाल्याबरोबर

ज्वारीच्या उलाढालीत गुंतलेल्या व्यापाऱ्यांची संख्या वाढली. अनुज्ञाप्ती शुल्काच्या उत्पन्नाने पुन्हा एकदा भरीव वाढीकडे वाटचाल सुरु केली आणि १९८६-८७ मध्ये त्याने ४९,४६१ रुपयांचा उच्चांक गाठला.

तसेच तक्ता क्र.४.६ मधील निर्देशांकाचे अवलोकन केल्यास १९५०-५१ ते १९६०-६१ या दशकात निर्देशांक ६0 वरुन १३८ पर्यंत वाढला आहे. याचा अर्थ अनुज्ञाप्ती शुल्क या काळात दुपटीपेक्षाही अधिक वाढले आहे. शिवाय १९६३ पासून ज्वारीची एकाधिकार खरेदी योजना अमलात आणल्यामुळे १९७२ पर्यंतच्या काळात अनुज्ञाप्ती शुल्काचा निर्देशांक परत कमी झालेला दिसतो तर १९७३-७४ पासून परत अनुज्ञाप्ती शुल्काच्या निर्देशांकामध्ये वेगाने वाढ होत गेली. आणि १९८६-८७ मध्ये तर तो १७२ पर्यंत वाढत जाऊन अनुज्ञाप्ती शुल्का पासून मिळणाऱ्या उत्पन्नाने उच्चांक गाठला.

### ४.७.२ बाजार शुल्क :

बाजार समितीला मिळणाऱ्या उत्पन्नाचा हा एक महत्वाचा मार्ग आहे. या पासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा एकूण उत्पन्नात सर्वाधिक वाटा राहतो. बाजार आवारात शेतीमाल खरेदी-विक्री व्यवहारावर खरेदीदाराकडून बाजार शुल्क आकारले जाते. सध्या हा दर शेकडा ६५ पैसे आहे. बाजार शुल्कात वेळोवेळी केलेली वाढ आणि बाजार आवारातील आवकेत होत गेलेली वाढ या कारणाने बाजार समितीला मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये सतत वाढ होत राहिली आहे. १९४९-५० मध्ये बाजार समितीला अडत बाजार, कडबा बाजार आणि जनावार बाजार यातून एकूण ४,२२३ रुपये उत्पन्न मिळाले होते. ते १९८६-८७ मध्ये १३,३६,0२६ रुपये मिळाले. विशेष म्हणजे मिळणाऱ्या एकंदर बाजार शुल्कात अडत बाजारातून सर्वात जास्त शुल्क मिळाले तर अडतीपासूनच्या शुल्कामध्ये ज्वारीचा हिस्सा सर्वात मोठा आहे. तक्ता क्र.४.७ मध्ये बाजार

निहाय बाजार शुल्कांपासून मिळणा-या उत्पन्नाचा तपशील दिला आहे·

तक्ता क्र·४·७

बार्शी बाजार समितीला बाजार शुल्कापासून मिळालेले उत्पन्न( रुपये)

| वर्ष | अडत बाजार | कडबा बाजार | जनावर बाजार | इतर (लाकूड) | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १९४९-५० | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | ४,२२३ |
| | | | | | (१००·०० ) |
| १९६५-६६ | १,७३,४९९ | ८०० | २६,२७१ | उ·ना· | १,००,५७० |
| | (७३·०८) | (०·८०) | (२६·१२) | | (१००·००) |
| १९७०-७१ | १,५४,१९३ | २,०५३ | ३०,०९० | उ·ना· | १,८६,३३७ |
| | (८२·७५) | (१·१०) | (१६·१५) | | (१००·००) |
| १९७५-७६ | २,४५,०२५ | ३,९२६ | ४६,७७७ | ३,६८७ | २,९९,४१५ |
| | (८१·८४) | (१·३१) | (१५·६२) | (१·२३) | (१००·००) |
| १९७९-८० | ६,९४,७१७ | ३३,५२६ | ६,३२२ | उ·ना· | ७,३४,५६५ |
| | (९४·५७) | (४·५७) | (०·८६) | | (१००·००) |
| १९८३-८४ | १०,५२,०२७ | २३,५२५ | १,२८,७६४ | उ·ना· | १२,०४,३१६ |
| | (८७·३५) | (१·९५) | १०·७०) | | (१००·००) |
| १९८६-८७ | १२,०२,४७६ | २४,०३४ | १,०९,५१६ | " | १३,३६,०२६ |
| | (९०·००) | (१·८१) | (८·१९) | | (१००·००) |

टीप : कंसातील आंकडेवारी एकूणाशी टक्केवारी दर्शविते·
उ·ना· चा अर्थ उपलब्ध नाही असा आहे·

आधार : कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी -संबंधित वर्षांच्या अहवालावरुन

तक्ता क्र.४.७ वरुन बाजार समितीला बाजार शुल्कापासून मिळणा-या उत्पन्नात वाढ होत असल्याचे आढळते. एकूण बाजार शुल्कामध्ये अडत बाजारापासून मिळणा-या उत्पन्नाचे प्रमाण सर्वाधिक आहे. १९६५-६६ मध्ये एकूण बाजार शुल्कापैकी ७१.०८ टक्के शुल्क अडत बाजारातून मिळाले होते ते १९८६-८७ मध्ये ९० टक्क्यापर्यंत वाढले. अडत बाजारात ज्वारीची उलाढाल अधिक होत असल्याने अडत बाजार शुल्कामध्ये ज्वारीचा वाटा सर्वाधिक आहे यात शंका नाही. यावरुन बाजार समितीला बाजार शुल्काचे जे एकंदर उत्पन्न मिळते त्यात ज्वारीच्या व्यापारातून मिळणारे शुल्क सर्वात जास्त आहे. म्हणून बार्शी पेठ ही सर्वच बाबतीत ज्वारी बाजारावर अवलंबून आहे असेही म्हणता येईल.

४.७.३ प्रतवारी शुल्क :

कृषी उत्पादन बाजार समितीच्या कामकाजातील जी प्रमुख कर्तव्ये कायद्याने ठरवून दिलेली आहेत त्यापैकी शेतीमालाची प्रतवारी ठरविणे हे एक महत्वाचे कार्य आहे. बार्शी बाजार समितीने १९६२ पासून प्रतवारी योजना प्रथमत: भुईमुगासाठी व त्यापाठोपाठ ज्वारीसाठी अमलात आणली. १९७१-७२ पासून हळदीचा समावेश झाला. सध्या बार्शीपेठेत भुईमूग, ज्वारी, तूर, मूग, उडीद आणि हळदीची विक्रीपूर्वी व्यापारी प्रतवारी केली जाते. १९६२ पासून १९७५ पर्यंत बार्शी पेठेत शेतीमालाची प्रतवारी विनाशुल्क केली जात होती, कसलेही प्रतवारी शुल्क आकारले जात नव्हते. हे काम अधिक चांगले करता यावे या उद्देशाने १९७४-७५ मध्ये प्रतवारी शुल्क आकारल्याबाबत समितीने पोटनियम तयार करुन शासनाकडे मंजुरीसाठी पाठवला. शासनाने उपविधी १२(३) नुसार प्रतवारी शुल्क आकारण्यास बाजार समितीला १०सप्टेंबर, १९७४ रोजी मंजुरी दिली. त्यानुसार बाजार वर्ष १९७५-७६ पासून शेकडा ५ पैसे प्रतवारी शुल्क आकारण्यास प्रारंभ केला व बाजार समितीला उत्पन्नाचा एक

नवीन मार्ग मिळाला. प्रतवारी शुल्क हे शेतीमाल उत्पादकाकडून घेतले जाते. अर्थात उत्पन्न मिळवणे हा या शुल्काचा प्रधान उद्देश नाही. प्रतवारीचे काम अधिक चांगल्या प्रकारे करणे शक्य व्हावे यासाठी हे शुल्क घेतले जाते. १९७५-७६ पासून १९८६-८७ या दहा वर्षांच्या काळात बार्शी बाजार समितीला प्रतवारी शुल्करूपाने मिळणारे उत्पन्न वाढते राहिले आहे. याचाच अर्थ शेतीमाल प्रतवारीचे महत्व उत्पादकाना पटवून देण्यात व त्यापासून मिळणारा फायदा मिळवून देण्यात बार्शी बाजार समितीने प्रगतीपर पाउल टाकले आहे. याची जाणीव तक्ता क्र.४.८ वरुन होईल.

तक्ता क्र.४.८

बार्शी बाजार समितीला प्रतवारी शुल्क रुपाने मिळालेले उत्पन्न

| वर्ष | प्रतवारी शुल्क (रुपये) |
|---|---|
| १९७५-७६ | २६,६३३ |
| १९७६-७७ | २७,१९४ |
| १९७७-७८ | ३९,७४० |
| १९७८-७९ | ४५,८५१ |
| १९७९-८० | ४६,९४८ |
| १९८५-८६ | ६०,३५४ |
| १९८६-८७ | ४०,५६४ |

आधार : कृषी उत्पादन बाजार समिती, बार्शी. - संबंधित वर्षांचे अहवाल.

बाजार समितीने प्रतवारी शुल्क आकारण्यास प्रारंभ केला त्याच वर्षी (१९७५-७६) प्रतवारी शुल्कापासून २६,६३३ रुपये उत्पन्न मिळाले. तर १९८६-८७ मध्ये ते ४०,५६४/-रुपये मिळाले. प्रतवारी शुल्कापासूनच्या मिळणा-या उत्पन्नामध्ये वाढीची प्रवृत्ती दिसत आहे. १९७५-७६ ते १९८६-८७ या काळात प्रतवारी शुल्काच्या उत्पन्नात निव्वळ वाढ १३,९३१ रुपयांची झाली. प्रतवारी शुल्काचे सर्वाधिक उत्पन्न १९८५-८६ या वर्षात मिळाले.

सारांश, बाजार समितीने प्रतवारी कार्यात प्रगतीपर पाऊल टाकले आहे.

वरील सर्व तपशील एकत्रितपणे विचारात घेतल्यास, बार्शी बाजार समितीने शेतीमालाच्या विपणनासाठी जरूर असणा-या पायाभूत सुविधा पुरविण्याचा आटोकाट प्रयत्न केला असल्याचे आढळते. महाराष्ट्रात जी कांही बव्हंशी विकसित बाजार आवारे आहेत त्यामध्ये बार्शी बाजार आवाराचा समावेश होतो. याचा फायदा विशेषत: ज्वारी विपणनाला झाला आहे. म्हणून बार्शीमध्ये ज्वारीच्या बाजाराचा विकास होण्यात ज्या विविध घटकांचा हातभार लागला आहे त्यामध्ये शहरातील विकसित बाजार आवाराचा महत्वाचा वाटा आहे असे म्हणता येईल.

=0=0=0=0=0=